३९ महात्मा जोतीराव फुले यांचे कृषिविषयक विचार – डॉ.प्रदीप जगताप, सोलापूर ---------- १६१

४० डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारीतेचा चिकित्सक अभ्यास
– डॉ.जयपाल सावंत, कोरेगाव, जि.सातारा ------------------------------ १६५

४१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि योगदान: संक्षिप्त आढावा
– डॉ.अशोक कदम, माढा, जि.सोलापूर -------------------------------- १६९

४२ महात्मा फुलेंनी केलेली समाजक्रांती : एक ऐतिहासिक अध्ययन
– डॉ.प्रज्ञा कामडी, मोवाड, ता.नरखेड, जि.नागपूर -------------------------- १७३

४३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विचारांची प्रासंगिकता
– डॉ.अंकुश करपे, करमाळा, जि.सोलापूर ------------------------------ १७८

४४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार
– डॉ.काशिनाथ तलंगे, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर -------------------------- १८३

४५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मविषयक भूमिका
– डॉ.डी.पी.खराडे, भिलवडी, जि.सांगली ------------------------------ १८८

४६ राज्य–समाजवादाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार
– डॉ.पंडित लावंड, बार्शी, जि.सोलापूर -------------------------------- १९१

४७ स्त्री शिक्षणाचे कैवारी महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य – डॉ.एम.एस.जडल, पंढरपूर --- १९४

४८ महात्मा फुलेंची वैचारिकता – डॉ.मोहन चव्हाण, सोलापूर -------------------- २००

४९ महात्मा फुले यांचे साहित्य – एक अभ्यास
– १) प्रा.बजरंग मोरे, कोल्हापूर, २) प्रा.प्रकाश जमदाडे, दहिवडी, जि.सातारा. --------- २०३

५० डॉ. आंबेडकरांचे सत्ताकारण व शिक्षण यांच्या सहसंबधाचे विचार – प्रा.सचिन मोरे, अहमदनगर २०६

५१ म. फुले यांचे 'शेतकऱ्याचा असूड' ग्रंथातील शेतकरी वर्गाविषयीचे विचार
– प्रा.नील नागभिडे, उस्मानाबाद -------------------------------------- २०९

५२ कामगारांचे भाग्यविधाते डॉ.बाबसाहेब आंबेडकर – प्रा.नारायण बनसोड, सोलापूर -------- २१४

५३ राष्ट्रपुरूष महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक कार्य : विशेष संदर्भ तळेगाव ढमढेरे गाव –
– डॉ.पद्माकर गोरे, तळेगाव ढमढेरे, ता.शिरूर, जि.पुणे ---------------------- २१९

५४ महात्मा जोतिराव फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार – प्रा.संगिता पैकेकरी, माढा, जि.सोलापूर २२३

५५ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही दृष्टिकोनाची समकालीन प्रस्तुतता –
– प्रा.पद्माकर पाटील, सोलापूर ---------------------------------------- २२६

५६ महात्मा फुले यांचे कृषी व उद्योगाविषयक विचार – प्रा.वनदास पुंड, कर्जत, जि.अ.नगर ----- २३१

५७ महिलांच्या सक्षमीकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
– डॉ.अरविंद पुनवटकर, सावनेर -------------------------------------- २३३

५८ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भटक्या विमुक्त जमाती विषयक दृष्टीकोण –
– प्रा.राजेश लोखंडे, कोरेगाव, जि.सातारा ------------------------------ २३७

५९ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार – प्रा.कैलास रोडगे, कर्जत, जि.अहमदनगर --- २४३

६० भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार – प्रा.रुपाली डिकोंडा, माढा, सोलापूर २४६




Dada Patil Mahavidyalaya Karjat, Dist. A'Nagar

13.70



ISSN No. 2394-5990

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

डॉ.रोडगे कैलास दादासाहेब
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि.अहमदनगर.
Email : rodagekailas@gmail.com

**प्रस्तावना :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे क्रांतिकारी, प्रेरणादायी आणि मानवतावादी आहेत. मानवाच्या कल्याणातच स्वत: चे कल्याण आहे असे मानणारे युगप्रवर्तक म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. समाजप्रगतीचे एक साधन म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विचाराकडे पाहिले आहे. त्यांचे आर्थिक विचार सुधारणावादी होते.मुळातच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मुख्य विषय हा अर्थशास्त्र होता. त्यांच्या विचारांना राष्ट्रीय अधिष्ठान होते. त्यांनी समाजहित डोळ्यांसमोर ठेवून 'बहुजनहिताय बहुजन सुखाय' हा मंत्र देवून या मंत्राच्या माध्यमातून आपले विचार मांडले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विविध आर्थिक संकल्पनांचा अभ्यास करणे.

३. देशातील संपत्तीच्या मूलाधाराचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती -**

सदर शोधनिबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील गरिबी दूर करण्यासाठी समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग सुचविला. त्यांच्या मते सरकारी क्षेत्रामध्ये शेती, उधोगधंदे आणि वित्त व्यवसाय असावेत आणि अशा प्रकारचे परिवर्तन हे लोकशाही पद्धतीने घडून आले पाहिजे. देशाचे आर्थिक नियोजन करताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशेष असे वेगळे स्थान असले पाहिजे. सरकारचा आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात अधिकचा सहभाग असला पाहिजे. याबाबत ते आग्रही होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मजुरी आणि सार्वजनिक सेवा यावर अधिक भर देवून त्याला संरक्षण मिळाले पाहिजे असे मत मांडले.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था असून या अर्थव्यवस्थेत कालानुरूप बदल केला पाहिजे. बंदिस्त अर्थव्यवस्थेचे मुक्त अर्थव्यवस्थेकडे संक्रमण झाले पाहिजे. जमीन सुधारणा कायदा, सामुहिक शेती, जमीनदारी पद्धतीचे उच्चाटन यासारख्या महत्वाच्या सामाजिक प्रश्नावर परखड मत व्यक्त केले. देशामध्ये आर्थिक आणि सामाजिक विषमता ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेमधून निर्माण होते. ती नष्ट करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केला.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात वित्तीय धोरणात शेतकऱ्यांची कश्याप्रकारे पिळवणूक केली याचे विश्लेषण केले आहे. जाचक जमीन महसुलामुळे देशातील जनतेचे कशा प्रकारे आर्थिक शोषण केले गेले याचे विश्लेषण त्यांनी केले. त्यांनी दारिद्र्याचे मूळ कशामध्ये आहे हे स्पष्ट केले. त्यांच्या मते भारताच्या वसाहतवादी राज्यकर्त्यांनी अतिरिक्त नफा मिळवण्यासाठी महसूल खर्चापेक्षा नफा कसा जास्त आहे हे त्यांनी दाखवून दिले. कोलंबिया येथे मानववंशशास्त्रावर परिषद भरली होती त्यामध्ये डॉ.आंबेडकरांनी प्रो.गोल्डन वाईजर यांच्या उपस्थितीत अर्थशास्त्र हा विषय कोणत्याही विषयाशी संबंधित नसुन भारतातील जाती या विषयावर होता. यामध्ये त्यांनी जातींची आर्थिक पाळेमुळे कुठपर्यंत पोहचली आहेत याचा संपूर्णपणे आढावा घेतला. त्यांची विचार करण्याची ही प्रवृत्ती संपूर्णपणे वेगळी होती व ती अशा प्रकारच्या विषयावर काम करणाऱ्या जागतिक पातळीवर इतर कोणालाही सुचली नव्हती. सामाजिक किंवा आर्थिक कोणत्याही प्रकारच्या शोषणाचा विशेषत: या दोन्हींच्या एकत्रीकरणाचा त्यांना तिटकारा होता त्यामुळे शेतकरी संघटीत झाला पाहिजे आणि त्याने आपल्या हक्कांसाठी लढा दिला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्योगधंद्यांबाबतचे विचार:-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उद्योगाबाबत राष्ट्रीकरण हे विकासाचे मॉडेल होईल असे मत व्यक्त केले. औद्योगीकरणातुन भारताचा सर्वांगीन विकास होणार आहे. आयुर्विम्यांचे राष्ट्रीयीकरण आणि वाहतुक कंपन्यांचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे. या मतावर ते ठाम होते.



Dada Patil Mahavidyalaya Karjat, Dist. A'Nagar

Scanned with CamScanner

राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाचा अवलंब झाला तर भारताला विकासाचा टप्पा सहज गाठता येईल असे त्यांचे मत होते.त्यांच्या विचारातुन उदारमतवाद प्रकर्षाने जाणवत होता. कोणत्याही वर्गाला किंवा गटाला विशेषाधिकार असणार नाहीत कायद्याच्या अधिसत्तेतुन सर्वसमावेशकता असावी. डॉ.आंबेडकरांमुळे दामोदर नदी खोरे प्रकल्प, भाक्रा नांगल, चंबळनदी प्रकल्प यासारखे प्रकल्प पूर्णत्वास गेले. त्यांच्या मते मोठ्या प्रमाणावर रोजगार वाढला तर आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढून त्यांचा मोठ्याप्रमाणावर खप वाढतो. यामुळे कामगारांची मागणी वाढते. परदेशी भांडवलावरील अवलंबित्व कमी होते आणि कामगारांच्या रोजगारांच्या सुरक्षेत वाढ होते या सर्व घटकांमुळे देशाचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यास मदत होते. सामन्य माणसाला फायदेशीर ठरू शकेल असे आर्थिक विकेंद्रीकरण करण्यावर बाबासाहेबांचा भर होता.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ईस्ट इंडिया कंपनीच्या वित्तव्यवस्थेबाबतचे विचार :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन सर्वसामान्यपणे सार्वजनिक वित्त या विषयाखाली मोडते. सर्वसामान्य जनतेच्या कल्याणावर परिणाम करणारे राष्ट्रीय धोरण आणि कोषागाराचे कामकाज या दोन गोष्टींशी सार्वजनिक वित्तव्यवस्था निगडीत आहे.भारतीय उपखंडात इंग्रजांनी आपली पोलादी पकड बसविण्याकरिता वसाहतवादी राजकर्त्यांनी कोणती आर्थिक साधने वापरली हे समजुन घेण्याकरिता त्यांनी आपला एम.ए. चा प्रबंध त्यावरती लिहीला. ईस्ट इंडिया कंपनी ही आर्थिक व्यवस्था अतिशय परिणामकारकरित्या वापरून भारतीय अर्थव्यवस्थेमधुन असाधारण नफा मिळविण्याचा प्रयन्त करीत होती. वसाहतवाद्यांचा प्रमुख हेतू हा भारतातील सर्व साधनसंपत्ती गिळून घेण्याचा होता. डॉ.आंबेडकरांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय पद्धतीचे विश्लेषण करताना ते कंपनी नियंत्रित करणाऱ्या बोर्डाचे वर्णन 'कोर्ट ऑफ प्रोप्रायटरर्स आणि कोर्ट ऑफ डायरेक्टर्स' असे करतात. गव्हर्नर बाबत म्हणतात की एकाच हाती सर्व सत्ता एकवटलेला असा स्वायत्त अधिपती. ईस्ट इंडिया कंपनीने वापरलेल्या आर्थिक पकडीचे विस्तृतपणे विश्लेषण करून त्यांनी भारतातून महसुल कशाप्रकारे जमा केला जात होता हे दाखवून दिले. ब्रिटिशांनी जमीन महसुलातील जमीनदारी व रयतवारी पद्धतीचे वर्णन करीत त्यांनी ब्रिटीश भारतातील महसुल पद्धतीचे सखोल विश्लेषण केले. त्यामध्ये अफुवरील कर, मिठावरील कर, कस्टम्स, तंबाखूवरील कर, वाहनावरील कर, अबकारी ड्यूटी, स्टॅपड्युटी यासारख्या करामुळे ब्रिटीशांचा महसुल वाढला मात्र स्थानिक जनतेचे नुकसान झाले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चलनविषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'The Problem of the Rupee' या ग्रंथामध्ये चलन पद्धतीविषयी चर्चा केली आहे. आंबेडकरांनी इ.स.१८०० ते इ.स. १८८३ पर्यंतच्या जवळ-जवळ १०० वर्षाच्या कालखंडात विनिमयाचे माध्यम म्हणून भारतीय रुपयाची उत्क्रांती कशी होत गेली आणि ती भारताच्या दृष्टीने अधिक परिणामकारक कशी ठरली याचे विश्लेषण त्यांनी केले आहे.त्यावेळी प्रचलित असलेल्या सुवर्ण परिमाण व सुवर्ण विनिमय परिमाण या दोन पद्धतीपैकी भारताला कोणती पद्धती उपयुक्त ठरेल या विषयी परखड मत मांडले. प्रा.केन्सच्या मते भारताला सुवर्ण विनिमय परिमाण पद्धती ही अधिक उपयुक्त ठरेल कारण त्यामध्ये लवचिकता आहे. त्यामुळे जेव्हा- जेव्हा कागदी चलनाचे सोन्यामध्ये रुपांतर करता येऊ शकते मात्र डॉ.आंबेडकर या विचाराशी सहमत नव्हते. त्यांच्या मते यामध्ये लवचिकता असली तरी या पद्धतीमुळे भारतातील चलन निर्मितीवर प्रत्यक्ष काहीही नियंत्रण राहणार नाही त्यामुळे अतिरिक्त चलन निर्माण होऊन महागाई वाढेल पैशाची खरेदीशक्ती कमी होईल त्यामुळे भारतीय रुपया अस्थिर होईल. डॉ.आंबेडकर म्हणतात की, रुपयाला सोन्याच्या किमतीबरोबर असलेले साम्य कायम ठेवण्यात अपयश आलेले आहे. त्यामुळे तो आपली क्रयशक्ती गमावून बसला आहे. म्हणून चलनाचे मुल्य स्थिर राहण्यासाठी त्यावर चलननिर्मितीवर नियंत्रण असले पाहिजे. आणि ते करण्यासाठी ज्याप्रमाणे लोकांना टांकसाळी बंद असतात त्याप्रमाणे सरकारलाही बंद केल्या पाहिजेत. जेव्हा वाटेल तेव्हा व तितकी चलन निर्मिती केल्यामुळे चलन फुगवटा होऊन महागाई वाढेल त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय रुपयाचे मुल्य कमी होईल आणि हे भारताला परवडणारे नाही. त्यामुळे यावर पर्याय म्हणून आंबेडकर म्हणतात की, निर्गमनाची एक निश्चित मर्यादा असलेला अपरिवर्तनीय रुपया हाच स्थिर राहू शकतो आणि त्यासाठी भारताने योग्य ती पावले उचलली पाहिजे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सहकार क्षेत्राबाबतची भूमिका -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सहकारबाबत आग्रही होते त्यांच्या मते सहकारी तत्त्वावरील चालणाऱ्या खेडेगावातील



Scanned with CamScanner

ISSN No. 2394-5990

13.72

सहकारी संस्थांमध्ये अस्पृश्यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे. जेणेकरून त्यांना आपल्या आर्थिक प्रगतीमध्ये सुधारणा करता येतील. पोलीस खाते आणि लष्करी खाते यामध्ये होणाऱ्या भरती प्रक्रियेत दलित वर्गाला सामावून घेण्यात आले पाहिजे. नगरपालिकेत काम करणाऱ्या झाडू कामगारांना प्रोव्हीडंट फंड लागू करून त्यांना नोकरीबाबत संरक्षण देण्यात यावे. राने तोडून मिळालेली जमीन व चैरण ही दलित वर्गास देण्यात यावी. रेल्वे, गिरण्या यामध्ये दलित वर्गातील मुलांना नोकरी व शिकण्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी. संपूर्ण समाजाची प्रगती व्हावी समाज एकसंघ व्हावा यामध्ये सर्वांचे कल्याण होणार आहे असे मत आंबेडकरांचे होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार कल्याण, महिला सबलीकरण, शिक्षण, अर्थनिती, राजनीती याबाबत काळाच्या पुढे जाऊन अनेक गोष्टी केल्या. भारताच्या आर्थिक जीवनाला दिशा देणारे महानायक म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता याचे ते निर्माते होते. आर्थिक आणि राजकीय लोकशाहीचा भक्कम पाया म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. बाबासाहेबांनी मांडलेले आर्थिक विचार आजही उपयोगी आहेत. त्यांची आर.बी.आय.च्या स्थापनेबाबत भूमिका, जमीन सुधारणाबाबतचा दृष्टीकोण आजच्या काळातही महत्वाचा मानला जातो.

**संदर्भ ग्रंथ :**


१. काळे बी.एस., अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर इस्लामपूर, २०१४.

२. पवार दया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, मुंबई,१९९३.

३. बोल महामानवाचे, खंड- एक डॉ.नरेंद्र जाधव.

४. डॉ.आंबेडकर - क्रांतिकारी विचाराचे अर्थतज्ञ, डॉ.विकास आढाव, प्रभात - १४ एप्रिल २०१८.

५. गंगाधर पानतावणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, पुणे, १९९२.

६. धनंजय किर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, १९९६.

७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर : राज्य समाजवाद व लोकशाही.


●●●



Scanned with CamScanner